# वसई-विरार शहर महानगरपालिका
## महिला व बालकल्याण विभाग
## मुख्य कार्यालय, विरार

दिनांक :१७/०४/२०२५

## प्रेस नोट

**वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचे वेबसाईट द्वारे ऑनलाईन अर्ज करता येणार. तरी महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा - मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑनलाईन स्वरुपात मिळवता यावा यासाठी पोर्टलची सुरुवात करण्यात आली आहे. पोर्टलच्या माध्यमातून महिलांना खालील योजनांसाठी अर्ज करता येणार आहे.

१) अनाथ / निराश्रीत मुलांना दत्तक घेतलेल्या पालकांना प्रोत्साहानात्मक अनुदान देणे.

२) विधवा / घटस्फोटित /निराधार/ परित्यक्ता महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान देणे.

३) सर्व वयोगटातील महिलांना डायलेसीस उपचारा करिता अर्थसहाय्य देणे.

४) एकाकी ज्येष्ठ निराधार वय वर्ष ६० वरील महिलांच्या उपजिविकेकरिता अनुदान देणे.

५) महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत कुटूंबाला त्यांच्या उदरनिर्वाहाकरिता अनुदान देणे.

६) अनाथ / निराधार मुलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य.

७) ज्या महिलेचे पती व्याधिग्रस्त असुन अंथरुणास खिळलेले आहे अशा महिलेच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शैक्षणिक अर्थसहाय्य देणे.

८) कॅन्सरग्रस्त महिलेस उपचारासाठी अर्थसहाय्य देणे.

९) विधवा / घटस्फोटित / निराधार / परित्यक्ता महिलेच्या मुलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देणे.

१०) कोव्हीड-१९ रोगामुळे आई किंवा वडील मयत झाले असल्यास त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शैक्षणिक अर्थसहाय्य देणे.

११) १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुला व मुलींना उपजिविकेकरिता अर्थसहाय्य देणे.

१२) महानगरपालिका हद्दीतील एच आयव्ही / एड्स बाधीत पालकांच्या मुलांना शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देणे.

१३) महानरपालिका हद्दीतील महिलांना मेमोग्राफी व पॅप स्मीअर चाचणी करण्याकरिता अर्थसहाय्य देणे.

१४) अनाथ / निराधार मुलींना विवाह सोहळयासाठी अर्थसहाय्य देणे.

**महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे महिलांना योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता राहणार नाही.घरबसल्या मोबाईल किंवा संगणकावरुन अर्ज करता येणार असून, पारदर्शक व जलद प्रक्रिया यामुळे अधिकाधिक महिलांना योजनांचा लाभ मिळणार आहे.**

या सर्व योजनांची महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दैनंदिन अंमलबजावणी सुरू असून,याबाबतचे **ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील दिलेल्या QR code वर स्कॅन करुन किंवा https://mahilabalkalyan.rtsvvmc.in/ या लींक वरुन अर्ज करु शकता** तरी सदर योजनांकरिता पात्र महानगरपालिका हद्दीतील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी केले आहे.

**महिला व बालकल्याण विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**